साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

Govt. College of Arts & Science

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक (भाग-४)

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. युवराज धबडगे　　प्रा. नागेश बोन्तेवाड
मराठी विभागप्रमुख　　मराठी विभाग
दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, जि. औरंगाबाद

● संपादक मंडळ ●

डॉ. सर्जेराव जिगे　डॉ. ताहेर पठाण　डॉ. ममता इंगोले
डॉ. फुला बागूल　डॉ. वंदना महाजन　डॉ. वामन जाधव
डॉ. अनिल गर्जे　डॉ. रामचंद्र झाडे　डॉ. यशवंत सोनुने
डॉ. संजय सांभाळकर

मूल्य : ३५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

| | | |
|---|---|---|
| 44. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील सामाजिकता<br>- डॉ. मिलिंद भगवानराव बचुटे / - सुधाकर चौधरी | 189 - 191 |
| 45. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य<br>- डॉ. योगिता देवगिरीकर | 192 - 194 |
| 46. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा. मनिषा डोंगरे | 195 - 197 |
| 47. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांतील मानवीमूल्य व संविधानत्मक विचार<br>- प्रा. डॉ. भरत दशरथ खंडागळे | 198 - 201 |
| 48. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- प्रा. ज्ञानेश्वर कांबळे | 202 – 204 |
| 49. | कवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील 'माणूस'<br>- प्रा डॉ डांगे दत्तात्रय महादेव | 205 - 208 |
| 50. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- डॉ. अंजली दशरथ काळे | 209 - 212 |
| 51. | आंबेडकर चळवळीचे गायक वामनदादा कर्डक यांचे समाज प्रबोधनातील योगदान<br>- डॉ सुरेश किशन भदरगे | 213 - 217 |
| 52. | वामनदादा कर्डक यांचे ललित साहित्य<br>- नयन काशीनाथ राणे | 218 - 221 |
| 53. | वामनदादांच्या कवितेतील सामाजिकतेला आंबेडकरी तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान<br>- प्रा. सारिका शिवाजीराव पासंगे | 222 - 225 |
| 54. | महाकवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- प्रा.डॉ. शैलजा श्रीधर शिंदे | 226 – 229 |
| 55. | वामनदादांच्या गझलेतील संग्रामशीलता<br>- डॉ. प्रकाश राठोड | 230 – 236 |
| 56. | समतेची क्रांतिगीते गाणारा लोककवी : वामनदादा कर्डक<br>- डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | 237 – 243 |
| 57. | वामनदादा कर्डकांच्या गीतातील सामाजिक पर्यावरण<br>- प्रा. डॉ. कल्पना नारायण गावडे | 244 – 247 |
| 58. | शाहीर वामनदादा कर्डक यांच्या गझलेचा आकृतिबंध<br>- गजानन भुसरे | 248 - 252 |




Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad



# समतेची क्रांतिगीते गाणारा लोककवी : वामनदादा कर्डक

**- डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे**
मराठी विभागप्रमुख, मशिसे. गट -अ
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.
मो. ७७९८१७७४७३

---

लोकशाहीर वामनदादा कर्डक हे खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याविचारांचे पाईक होते. आपले संपूर्ण जीवन त्यांनी फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांनासमर्पित केले. मुख्यत्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूलगामी विचार त्यांनी आपल्या गीतांमधून महाराष्ट्रातील वाडी-पाडे, तांडे आणि गावागावात पोहचविला. आंबेडकरी समतावादी चळवळी यांच्या कार्याची-कर्तृत्वाची पेरणी जनमाणसांत करून नवनवीन आंबेडकरी जलसे, भजनी मंडळे, कलापथके शाहीर व गायकांचे प्रेरक झाले. तद्वतच 'जिथं गाव तिथं भीमाच नाव' पोहचविणारे फकीर झाले.

वामनदादा कर्डक प्रतिभासंपन्न गीतकार होत. त्यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नरजवळ देशवंडी (दिसोंडी) या लहानशा गावी झाला. त्यांच्या आईचे नाव सईबाई तर वडिलांचे तबाजी असे होते कोणतेही औपचारिक शिक्षण घेतलेले नसताना साधारण १९४३ ला स्वत: गीतरचना करून त्यांनी गीतगायनास प्रारंभ केला. सर्वसामान्य कुटुंबात जन्म झाल्यामुळे जीवनात अनेक संघर्षमय प्रसंगाना त्यांनासामोरे जावे लागले. संघर्षमय जीवनात त्यांची प्रतिभा उत्तरोत्तर बहरत गेली.

वामनदादा कर्डक यांचे औपचारिक शिक्षण झालेले नव्हते. त्यांनी बाराखडीचे पुस्तक घरी आणून अक्षर ओळख करून घेतली. मग दुकानांच्या पाट्या, विविध पोस्टर, जुनी वर्तमानपत्रे वाचून ते लिहिणे, वाचणे शिकले. मराठी आणि हिंदीची लिपी एकच असल्याने त्यांना दोन्ही भाषा अवगत झाल्या. १९४३ मध्ये भायखळ्याला राणीच्या बागेत बसून 'किस्मत' या हिंदी चित्रपटातील कवी प्रदीप यांच्या चित्रपटावरील गीतावर आधारित विडंबन गीत लिहिले.

आज हिमालय की चोटी से फिर हमने ललकारा है,
दूर हटो ए दुनियावालों हिंदुस्तान हमारा है ... (कवी प्रदीप)
आज कितने दिनों से हमको अछुत कहके पुकारा है,
दूर हटो ए काँग्रेसवालों फेडरेशन ए हमारा है। (वामन कर्डक)

हा वामनदादांच्या प्रतिभेचा पहिला अंकुर होता उपरोक्त पंक्तीतील 'रचनातंत्र' जरी कवी प्रदीपांचे असले तरी संपूर्ण'आशय' हा स्वतंत्रपणे वामनदादा कर्डकांचा होता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १९५१ मधील सभेत हे गीत गायले तेव्हा आंबेडकरांनी दादासाहेब गायकवाडांना हे गीत आणि वामनदादाबद्दल विचारना केली, तेव्हा वामनदादांना शब्बासकी दिली. प्रेरित केले. यातूनच 'वामन कर्डक' यांना प्रचंड उत्साह, उर्मी निर्माण झाली. यातूनच पुढे हजारो गीत लिहिणाऱ्या या विलक्षण



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

प्रतिभा असलेल्या कवीचा उदय झाला. वामनदादा कर्डकांचे चरित्रकार प्रा. सागर जाधव लिहितात. ''असा एकही विषय नाही ज्याचा वामनदादांच्या कवितामध्ये आशय नाही. गेली सहा, सात दशके वामनदादांची गाणी गात-गात मागील तीन-चार पिढ्या मोठ्या झाल्या आहेत. किंबहुना वामनदादांच्या गीतांवरच या पिढ्यांचे वैचारिक परिपोषण झाले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.''[१] वामनदादा कर्डक यांच्या साहित्याची नोंद 'महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय खंड-१' मध्ये संपादक सागर जाधव यांनी केलेली आहे. त्यामध्ये –

वाटचाल -१९७२ (संपादक वामन निंबाळकर)

मोहळ - १९७६ (संपादक प्रा. मोहन गरुड)

माझ्या जीवनाचं गाणं (शब्दांकन रविचंद्र हडसणकर)

हे गीत वामनाचे - १९९७ (संपादक भास्कर जाधव)

महाकवी वामनदादा कर्डक - २०१० (संपा. माधवराव गायकवाड / प्रा. सागर जाधव)

उपरोक्त साहित्याची केलेली नोंद ही परिपूर्ण नाही, त्याची यादी पुढे वाढविता येईल. वामनदादांची भाषणे, सन्मानपत्रे, वगनाट्य यावरही एका स्वतंत्र (खंड -७) ची निर्मिती केली आहे. खंड -१ ते ६ मध्ये त्यांनी कविता प्रकाशित झाली. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर वामनदादांचे प्रेरणा क्षितीज् संस्कृतीनायक आणि युगनायक होते''[२] त्यांच्यावर खूप कविता वामनदादांनी लिहिल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रगतीशील होते त्यांना समाजात इष्ट परिवर्तन घडवायचे होते. त्यांच्या विचारांना कृतीची जोड होती. नवा मार्ग, नवी दिशा, नवा प्रकाश, नव्या प्रेरणा त्यांना पावलोपावली इशारा करीत होत्या. समाजात बदल घडविण्याची उर्मी, चेतना त्यांना निर्माण झाली व त्यांनी हे सर्व सत्यात उतरविले हे सर्व वामनदादा कर्डक यांनी पाहिले होते. वामनदादांच्या विचारांचा श्वास डॉ बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांना स्वत:तील कवी आणि गायकाची जाणीव झाल्यानंतर, ते गीतरचना करू लागले व गाऊ लागले.

''मशालवाल्या अन् शिवराजा
तुझं मशाल पुढं तरी दाव
काळ्या रातीतनं जायचं हाय
लई दूर माझ्या भीमाचं गाव ''

उपरोक्त 'गीत' मुंबईमधील शिवडी येथील सभेत गायले आणि त्यांना प्रचंडप्रतिसाद मिळाला. 'भीमराव जीवाचा विसावा गं बाई' या गाण्यालाही भरपूर दाद मिळाली. या गाण्यांवरील टाळ्यांच्या प्रतिसादाने मला कवी केले असे वामनदादा प्रांजळपणे सांगतात. वामनदादांनी शाहीर भीमराव कर्डक, शाहीर घेगडे, शाहीर आढांगळे या आंबेडकरी शाहीरांपासून प्रेरणा घेतली सुरुवातीला छोट्या-छोट्या मेळाव्यात ही गीते सादर केली. साधारणपणे १९४० नंतर उदयाला आलेल्या दुसऱ्या पिढीतील शाहिरांमध्ये वामनदादा कर्डक हे सर्वात लोकप्रिय आंबेडकरी शाहीर म्हणून नावारूपाला आले. पूर्वी दलित समाजात संतांचे अभंग, ओव्या, भारूडे, पदरचना गाणारी मंडळी गावोगाव होती. यातूनच प्रेरणा घेऊन मग भीमभजनी मंडळे, विविध पाटू या उदयाला आल्या. या विशेषत: भजनी मंडळात वामन कर्डकांची गीते सर्रास गायिली जात भजनी मंडळात ढोबळमानाने दोन प्रकार होते.

१) फीडल आणि ढोलकी किंवा खंजेरी अशा वाद्यांच्या साथ संगतीने गायन करणारीभजनी मंडळे.

२) हार्मोनियम, तबला, कडी या वाद्यांची साथसंगत घेऊनगायन करणारी भजनी मंडळे.''[३]

अशाप्रकारे भीमगीत भजनीमंडळे व गायन पाटू या तत्कालीन परिस्थितीत निर्माण झाल्या. त्यातूनच आंबेडकरी शाहीर आणि लोककवीची 'फळी' अस्तित्वात आली. त्यातही वामनदादा कर्डक हे सर्वात लोकप्रिय ठरले, ते त्यांच्या उत्स्फूर्त काव्यामुळे, विषयातील विविधतेमुळे बुद्ध-कबीर-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांची काव्यातून चपखलपणे पेरणी



Govt. College of Arts & Science
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

केल्यामुळे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान. त्यांचे सैद्धांतिक मूल्ये यांचा प्रचार-प्रसार त्यांच्या लोकगीतातून वामनदादांनी केला. आंबेडकरांच्या जन्म-उत्सवापासून ते त्यांच्या स्वातंत्र्य समता. बंधुता या उच्चकोटीतील मूल्यांचे अधिष्ठान असलेल्या विचारांचा आविष्कार गीतांमधून झाला.

इथे नाही जातीवाद, ना पोकळ वर्णभेद,
सर्वांवरती करितो प्रिती, माझा गौतम बुद्ध
सारे मानव प्राणी ना उच्च निच कोणी
कोणीही यावे शुद्ध बनावे बुद्धाच्या चरणी
इथे नाही जातीवाद, ना पोकळ वर्णभेद
सर्वांवरती करतो प्रिती माझा गौतम बुद्ध
दार खुले हे सर्वांना, शुद्रांना चांडाळांना
साळी, माळी, ब्राह्मण, कोळी विलीन व्हा त्रिशरणी.

वामनदादा कर्डकांच्या गीतामधून गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचे 'सार' आले आहे. समानतेवर आधारलेला समाजाची निर्मिती व्हावी. यासाठी त्यांचा प्रयत्न आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता, या मूल्यांवर लोकशाहीप्रणित समाजरचनेचा उगम होऊन न्यायाधिष्ठित समाजाची बांधणी व्हावी यासाठी वामनदादा बुद्धांचे तत्त्वज्ञान सांगतात उच्च-नीच भाव, वर्णभेद, जातीयवाद या बाबींना तिलांजली देऊन ज्यांनी उच्चत्तर सामाजिक नैतिक मूल्यांचा संदेश ज्या विज्ञानवादी गौतम बुद्धांनी दिला त्यांच्या विचारांची कास हिंदू धर्मातील सर्व जातीतील समाजाने धरली पाहिजे असे ठासून सांगतात

गौतम के नाम से हम बैठे है नाव में,
ले जाएगें हम सबको हम गौतम के गाँव में,
धरती के लोक आके गौतम के गाँव में,
बैठेगें लोग सारे पिपल की छाँव में.

भारतीय समाजात जी वर्णव्यवस्था आहे, ती समाजाला प्रगतीकडे नेण्यापासून रोखते आहे, समानता किंबहुना समता प्रस्थापित करण्यासाठी ती मोडून काढली पाहिजे. काळा-गोरा वर्णभेद, जातीयता याला नवसमाजात काही अर्थ नाही. माणसाचा मोठेपणा जन्मावर जन्मावर आधारित नसून कर्मावर आधारित आहे. ज्यांच्याकडे कुशल कर्म, चारित्र्यसंपन्नता, नीतीमत्ता आहे, तिच व्यक्ती श्रेष्ठ आहे. दया, शांती, प्रीती व करुणा आहे, बुद्ध धर्मात जेवढी करुणा आहे, तेवढी इतर कोणत्याही धर्मात नाही. जगातील मानवी जीवनाशी संबंधित सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन मार्गदर्शन गौतम बुद्धांनी केलेम्हणूनच गौतम बुद्धांना जगातील अनाकलनीय बाबींचे भाष्यकार असा शरणकुमार लिंबाळे जो उल्लेख करतात तो अगदी सार्थ वाटतो.

या संदर्भात प्रा. गौतम गायकवाड लिहितात, ''अशा भाष्यकाराच्या विचाराचा एक लहानसा भाष्यकार वामनदादा एक उपासक आहे. बुद्धचरणी लीन व्हावे... अंतशुद्ध व्हावे... शुद्ध मनाने बुद्ध व्हावे... बुद्धावाचून जगाला पर्याय नाही. आताच्या जगाला तारणारा... बुद्ध वाली आहे.''[४] वामनदादांच्या गीतामधून जसे गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान येते तसेच संत कबीर, महात्मा फुले यांचे ही येते. हे विचार जगाला उपकारक ठरणार आहेत हे ते निक्षून सांगतात. ज्योतीराव फुले भारतातील सामाजिक क्रांतीचे जनक होत. त्यांचाच वारसा आंबेडकरांनी चालविला फुले-आंबेडकरांच्या वाटेने जाणे गरजेचे आहे. 'वाट फुलेंची सोडून' या गीतात ते म्हणतात,

वाट फुलेंची सोडून
आंबेडकरांना तोडून
चालताच इयाचं नाय
तुला चालताच इयाचं नाय



Govt. College of Arts & Science

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

मनुच अंगडंटोपडं
माझ्या आंबेडकराला
घालताच इयाचं नाय
तुला घालताचं इयाचं नाय (वाट फुलेंची सोडून)

उच्चभ्रू समाजाने सर्व स्तरात आपले वर्चस्व कायम राहवे म्हणून या देशात जातीव्यवस्था निर्माण करून संपत्ती, अधिकार, शिक्षण, सवलती स्वत:कडे ठेवल्या, यातून विषमता निर्माण झाली. उत्तरोत्तर ही विषमता वाढत गेली. हा सर्व विषमताधिष्ठित समाज समताधिष्ठित करण्यासाठी महात्मा फुलेंसारखा महापुरुष जन्मावा लागला. समाजातील स्त्री, शूद्र, अतिशूद्रांना जागृत करण्यासाठी, त्यांना आपल्या हक्काची प्रथम जाणीव महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले या दाम्पत्यांनी करून दिली. त्यांनी जी वाट दाखवली त्या वाटेनेच आपल्याला जावे लागेल असे वामनदादा सांगतात. तत्कालिन परिस्थितीत फक्त समतेचा बुरखा पांघरलेला काही समाज सामान्य, अज्ञानी लोकांची दिशाभूल करीत होता; अशा दुटप्पी काही समाजद्रेषी लोकांपासून दूर राहण्याचा सल्ला वामनदादा गीतांमधून देतात.

''माणसाने इथे माणसाला
प्रेम द्यावे, प्रेम घ्यावे
दुजा कुठलाच नारा नसावा.
माणसाच्या विषारी मनाचे
विष सारे विषारी तनाचे
पेरणारा कुणीही नसावा (गाव सारा असा हा असावा)

माणसाने मानसाला प्रेम द्यावे, घ्यावे, आप-पर भाव कोणताच असता कामा नये. आज समाजात काही समाजवंटक विष पेरण्याचे काम करतात. माणसा-माणसांमध्ये सांमजस्य भाव निर्माण होईल असे काही तरी झाली पाहिजे. एकीकडे येथे भूक, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, उपासमार आहे. संघर्ष, विषमता, विश्वासघात, कुभाव, छळ, कपट, स्वार्थीपणा, ढोंगीपणा, संधीसाधूपणा, याने समाज बरबटला आहे; यातून समाज बाहेर आला पाहिजे. फुले-शाहू-आंबेडकरांचे विचार जनमाणसांत रुजले पाहिजेत. अशा आशावाद वामनदादा कर्डक व्यक्त करतात.

भेदाभेद नको। इथे शिरच्छिद नको
कुणाच्या जाचामुळे कुणाला खेद नको
घातकी डाव नको। मनी कुभाव नको
जिवा जाळील असा गुपित घाव नको
छळाचे नांव नको। स्वार्थी गाव नको
झोळी आपुलीच भरो। असली हाव नको (प्रेमाने जिंकिले जगा)

'समता संस्कृती' असावी, किंबहुना अस्तित्वात यावी हे वामनदादांचे स्वप्न होते. 'जगा आणि जगू द्या' हा संदेश ते समाजाला देतात. भांडवलशाही व ब्राह्मणशाही यामुळे येथील सामान्य कामगार नाडला गेला आहे. वरील दोन शोषणयंत्रणेमुळे समाजात विषमता अधिकच वाढली. भारतात जन्मजात अस्पृश्यता अस्तित्वात आहे, इतरत्र जगात असे कोठेही नाही; म्हणून भारतात धार्मिक आणि सामाजिक सुधारणा करणे गरजेचे आहे. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाचे जीवन हे पशुगत होते. हजारो वर्ष शारीरिक, मानसिक व आर्थिक पिळवणूक एका विशिष्ट समाजाची होत होती. सावली देखील अंगावर पडणे विटाळ मानला जात होता. पेशवाईत तर अस्पृश्यतेने कळस गाठला. फुले-शाहू- आंबेडकरांचा नव्या विचारांचा अंगिकार करा आता ही अस्पृश्यता संपवा, जुलूम-जाच सहन करून नका, ताठ मानेने आता जगले पाहिजे असे वामनदादा म्हणतात,

अस्पृश्यता घालवूनी स्वयंपूर्ण व्हायचे



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ध्येय ठरेल याच पुढती, मानाने जगायचे
नाही करायचा आता, जुलूम सहन रे

वामन दादांच्या कवितेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा संदेशपोहचविण्याचे काम केले. सामाजिक, आर्थिक भेदाभेद नष्ट झाला पाहिजे ही त्यांची प्रांजळभूमिका होती. भारतीय समाजात जोपर्यंत भेदाभेद, उच्चनीच्चता, विषमता असेल तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मता साधता येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, हजारो जातीमध्ये विभागलेले हे राष्ट्र लोकराष्ट्र कसे बनणार? सामाजिक व मानसशास्त्रीय अर्थाने आपण अद्याप राष्ट्र बनलेले नाही; याची जेवढ्या लवकर आपणाला जाणीव होईल, तेवढे चांगले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे मध्यवर्ती सूत्र हे 'मानवतावाद' आहे. शतकानुशतके अज्ञान, दारिद्र्य यामध्ये खितपत पडलेल्या समाजाला पशुसमान गुलामासारखे आयुष्य कंठणाऱ्या सामान्य जनतेला डॉ. आंबेडकरांनी मुक्तिचा मार्ग दाखविला.

भीम माझा लढे देत होता
मला समतेकडे नेत होता
जातीयतेची कीड मारणारा
उच्चनीच्चतेला खडे चारणारा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार त्यांच्या विचारधारेला मानणारे साहित्य हेप्रस्थापित व्यवस्था, विषमता, विशिष्ट लोकांना दिले गेलेले विशेषाधिकार, बहुजनांचा द्वेष करण्याची वृत्ती, मनुस्मृतीच्या विरोधात केलेले लेखन, विद्रोही, क्रांतिकारी तद्वतच समता, बंधुत्व, स्वातंत्र्य या मूल्यांचे अधिष्ठान असलेले साहित्यच मानवी कल्याणाचा मार्ग दाखवूशकते. म्हणूनच भालचंद्र फडके म्हणतात, ''साहित्य हे सामाजिक नियंत्रणाचे आणि मार्गदर्शनाचे साधन म्हणून सुद्धा कार्य करते.''[५] साहित्य हे जसे सामाजिक नियंत्रणाचे काम करते, तसेच ते समाजातील आर्थिक विषमता, भांडवलशाही याची लक्तरे वेशीला टांगत असते. हेच कार्य वामनदादांनी त्यांच्या गीतांमधून अगदी परखडपणे केले

सांगा आम्हाला बिर्ला, बाटा, टाटा कुठाय हो,
सांगा धनाचा साठा आमचा वाटा कुठाय हो ॥धृ॥
घाम शेतात आमचा गळं चोर ऐतचं घेऊन पळं
धन चोरांचा हा पळण्याचा फाटा कुठाय हो..॥१॥
लोणी सारं तिकडं पळं, इथं भुकेनं जिवडा जळं
दुकानवाले दादा आमचा आटा कुठाय हो....

उपरोक्त वामनदादांचे गीत गरीब व श्रीमंत वर्गातील दरी व्यक्त करते. सामाजिक, आर्थिक विषमता वामनदादा या गीतामधून मांडतात. काही समाज असा आहे की, त्यांच्या हाताला काम नाही, पोटाला पुरेशी भाकरी मिळत नाही, वस्त्र मिळत नाहीत, त्यांचा संसारफुटपाथ किंवा रस्त्यावर असतो. अशा लोकांना 'माणूस' म्हणून कधी जगता येणार आहे? त्यांचे काही माणूस म्हणून हक्क आहेत, ते त्यांना कधी मिळणार आहेत? असे प्रश्न ते गीतांतून मांडतात ज्या समाजावर अन्याय होतो आहे, त्यांना त्याची जाणीव करून देणे, त्यांना जागृत करणे, भांडवलशाहीविरुद्ध, शोषणाविरुद्ध आवाज उठविणे हे देखील साहित्याचे काम आहे. तसेच मानवी कल्याणाचे, समतेची गुढी उभारण्याचे काम आहे आणि ते वामनदादा त्यांच्या गीतांमधून केले आहे गरीबाला त्याच्या कामाचा योग्य मोबदला मिळत नाही, तो मिळाला पाहिजे असा आवाज ते उठवतात,

ठायी ठायी थेंब सांडले आमुच्या घामाचे
कधी न कोणी मोल मोजले आमुच्या कामाचे
आम्हीच केले थोर हजारो बिर्ला अन् बाटा

Govt. College of Arts & Science Aurangabad



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

समाजात वाढलेली नफेखोरी, चाचेगिरी, फसवेगिरी आणि सामान्य जनतेच्या श्रमावर, घामावर, पोसलेले धनदांडगे श्रीमंत लोक हे कसे फसवतात, लुबाडतात, यांची अन्यायी वृत्ती वामनदादा वेशीवर टांगतात. विषम अर्थव्यवस्थेला ते परखड सवाल करतात. आम्ही न्याय मागत आहेत? कशाला पळवाटा शोधत आहात? 'न्याय मागता उगी काढता, भलत्या पळवाटा' एकदा हा सर्व निवाडा होणे गरजेचे आहे. मग सोक्षमोक्ष झालाच पाहिजे.

''न्याय वेशीला टांगा सदामाल त्याचा की आमचा वदा

करा निवाडा, आणा तराजू काटा कुठाय हो.''

आज माणसाला गुलाब बनवून राबवून घेण्याची वृत्ती वाढत आहेत. भांडवलदार, कारखानदार श्रमिकांची पिळवणूक करत आहेत. आधुनिक वसाहतवादाने आर्थिक विषमता वाढवली आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण (मुक्त आर्थिक धोरण) यामुळे देशाला फायदा झाला, परंतु त्यामधून भांडवलदार, कारखानदार, जमीनदार यांचाच फायदा होत आहे. गरीब तो गरीब होत आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहे याचे वर्णन वामनदादांच्या अनेक गीतातून येते

वामनदादा कर्डक यांच्या शेकडो गीतांमधून समतेचे तत्त्वज्ञान आविष्कृत झाले त्यांची निरीक्षणशक्ती दांडगी आहे म्हणून त्यांच्या गीतांमधून अनेक विषय येतात. कोणताही विषय गीतांमधून मांडताना तो सूक्ष्मपणे मांडतातच पण त्याचबरोबर त्यामध्ये कमालीचा संयम असतो. या संदर्भात प्रा. बाबा बोराडे लिहितात, ''वामनदादांची निरक्षणशक्ती दांडगी आहे. ते पाहतात, अनुभवतात, त्यावर ते विचार करतात. समाजातील अतिसूक्ष्म घटना, घडामोडीवर त्यांचे बारीक लक्ष असते. दादांच्या गीतात विद्रोह आहे, पण तो तीव्र नाही, तो विधायक आहे, ते संयमी वृत्तीचे आहेत. त्यांना काही गोष्टी आवडल्या नसल्या तरी ते कुणाच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर प्रहार करीत नाहीत.''[६] म्हणून ते 'वाटचाल'मध्ये म्हणतात, माझे शब्द वाटल्यास चिरे समजा, दगड समजा, बसवता येतील तिथं बसवा, अन्यथा ही मातीची ढेकळं आहेत, अखेर मातीत मिसळतील.

थोडक्यात वामनदादा कर्डक यांची गीते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले यांच्या विचारांचा संदेश घेऊन अवतरतात. समाजातील रूढी, अंधश्रद्धा, अज्ञान यांना खिंडार पाडतात त्यांच्या विचारांची दिशा ही सरळ होती. मात्र विचाराला समाजात मानवतावाद रुजविण्यासाठी अनेक वंगोरे होते. म्हणूनच त्यांची लोकगीते, भीमगीते, निसर्गगीते, नाट्यगीते, राष्ट्रीय जाणीवेची गीते, सुभाषिते, समताक्रांती गीते गावागावात पोहचली. नुसती पोहचली नाहीत, तर योग्य संदेश त्यांनी दिला त्यांचा गौरव 'आंबेडकरवादी महागीतकार' असा जो डॉ. यशवंत मनोहर करतात तो अगदी यथार्थ आहे. वामनदादा कर्डकांनी जी साहित्यनिर्मिती केली, त्यामध्ये चार्वाक, गौतम बुद्ध, महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांचा पुरोगामी विचार सामावलेला आहे. ''परंपरावादामध्ये अडकलेल्या बहुजन समाजाला पुरोगामी विचार पटवून देण्याचे कार्य हे वामनदादांच्या साहित्याने केले.''[७]

वामनदादा कर्डकांनी लोकांना जागृत करण्यासाठी 'लोकसंगीत' आपल्या काव्यलेखनासाठी वापरले पाहिजे याची जाणीव त्यांना झाली व त्यांनी तोच संदेश पुढीलपिढ्यांसाठी दिला. दलित व सामान्य शोषित समाजाला जागृत करण्यासाठी त्यांनी औचित्य पूर्णतेने लोकसंगीताची योजना केली म्हणून डॉ. नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, ''वामनदादा कर्डक यांची पहाडी आवाजातील कविता हजारोंचा समुदाय श्रद्धेने ऐकत असे. ही किमया केवळ त्यांच्या आवाजाची नव्हती, तर आशयाचीही आहे.''[८] उपरोक्त विषयाला अनुसरुन काही निरीक्षणे नोंदविता येतील.

- वामनदादा कर्डकांच्या साहित्याचे मुख्य आशयसूत्र हे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा परिवर्तनवादी विचार आहे. तद्वतच बुद्ध, कबीर, फुले, शाहू, यांच्या विचारांचेप्रतिबिंब त्यांच्या काव्यात पावलोपावली जाणवते
- अंधश्रद्धा, रूढी आणि अनिष्ट परंपरावादामध्ये अडकलेल्या बहुजन समाजाला पुरोगामी विचार पटवून देण्याचे कार्य वामनदादा कर्डक यांच्या साहित्याने केले आहे, किंबहुना करत राहील.
- वामनदादा कर्डक सामाजिक, आर्थिक समतेचे स्वप्न पाहत आलेले आहेत. ते कितपत साध्य झाले हा आत्मपरीक्षणाचा व चिंतनाचा विषय आहे.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

- स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता या मूल्यांचा प्रचार-प्रसार वामनदादा कर्डक यांनी आपल्या गीतातून केला
- वामनदादांचे साहित्य हे चळवळीचे साहित्य आहे. तसेच ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व जीवनकार्य. तत्त्वज्ञान मांडणारे देखील आहे.
- वामनदादांच्या गीतांमधून डॉ आंबेडकरांच्या निर्वाणानंतर जो समाज चळवळी विस्कळीत झाल्या, त्यांची शकले निर्माण झाली, याची व्यथा, वेदना वामनदादांनी अनेक गीतांमधून मांडली आहे
- वामनदादा कर्डक यांच्या गीतांमधून समाजप्रबोधन झालेले आहे उदा. शिक्षण, दारुबंदी, हुंडाबळी, व्यसनमुक्ती इत्यादी.
- राष्ट्रीय एकात्मता, धरती, सैनिकांचा पराक्रम, श्रमिकांचे जीवन, शेतमजूर, सासुरवाशीन सून, भाऊ-बहीण, धरती अशा कितीतरी विषयांवर वामनदादांचीप्रतिभा बहरुन गेलेली दिसते.
- वामनदादा कर्डकांच्या लोकगीतांना सुभाषितांचे सौंदर्य प्राप्त झाले आहे तसेच त्यांनी 'गझल' आणि चित्रपट गीतांची निर्मिती प्रभावीपणे केली आहे.
- वामनदादांनी गीते लोकभाषेत लिहिली आहेत. तसे त्यांनी ग्रामीण बोलीभाषेतील शब्द संस्कृतीचा 'साज' आपल्या भाषेला चढवून ती भाषा अधिक प्रभावी केलेली आहे. म्हणूनच ती मानवी मनाचा, किंबहुना हृदयाचा ठाव घेते.

संदर्भ सूची :


१) गायकवाड माधवराव / जाधव सागर, महाकवी वामनदादा कर्डक - समग्र वाङ्मय, खंड-१, पृ. ४४

२) मनोहर यशवंत, आंबेडकरवादी महागीतकार : वामनदादा कर्डक, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. ७७

३) बोराडे बाबा, आंबेडकरी लोकशाहीर : वामन कर्डक, आनंद प्रकाशन, जयसिंगपूरा, औरंगाबाद, २०१३, पृ. १०

४) गायकवाड गौतम, वामनदादा कर्डक यांच्या गीतांचा आस्वाद, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१५, पृ. १०४

५) फडके भालचंद्र, दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, पृ. ४५

६) बोराडे बाबा, तत्रैव, पृ. ६५

७) निसर्गंध सिद्धार्थ, वामनदादा कर्डक : जीवन व कार्य, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जाने. २०२१, पृ. ६३

८) कोत्तापल्ले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९६, पृ. ८२


◆◆◆◆◆

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad